# मानवतेचा संदेश देणारी सजावट

**प्रथमेश दोंड, गायत्री देव**

देशभरात घरोघरी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये गणरायाचं धूमधडाक्यात स्वागत झालं. मुंबई आणि आसपासच्या अनेक कॉलेजांमध्येदेखील लाडक्या गजाननाचं स्वागत करण्यात आलं आहे. माटुंगा येथील **पोदार कॉलेज**च्या गणेशोत्सव मंडळानं ढोल-ताशाच्या गजरात पोदारच्या राजाचं स्वागत केलं. मंडळाचं हे ८५वं वर्ष असून 'धर्मो रक्षति रक्षितः' या संकल्पनेवर आधारित नेपथ्य, सजावट आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

मानवतेच्या धर्माचं रक्षण करण्याचा संदेश मध्यवर्ती संकल्पनेतून देण्यात आला. रोजच्या जीवनात असलेल्या जबाबदाऱ्या, कर्तव्य पार पाडताना तत्त्वांचं पालन करणं हादेखील धर्मच आहे, असं थीममधून सुचवण्यात आलं आहे. विविध पैलू संकल्पनेतून मांडण्याचा प्रयत्न मंडळाच्या सदस्यांनी केला. शास्त्रीय नृत्य सादरीकरणातून द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा प्रसंग दाखवण्यात आला. महाभारत घडलं त्या काळात असलेली परिस्थिती आणि आताच्या परिस्थितीत किती साम्य आहे, हे दाखवणारं नाट्यमय सादरीकरण पार पडलं.

> "धर्म म्हणजे द्वेष पसरवणारी भावना नसून एकता, मानवता आणि आपल्या तत्त्वांशी एकरूप असणं हा विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न यावर्षीच्या गणेशोत्सवातून केला आहे.
>
> – डॉ. विनिता पिंपळे, प्राचार्या, पोदार कॉलेज



### शुभेच्छांचा वर्षाव

अभिनेता संतोष जुवेकर, कन्टेंट क्रिएटर अंकिता प्रभूवालावलकर, क्रिकेटपटू आयुष म्हात्रे यांच्यासह अनेक कलाकार आणि इतर क्षेत्रांतील मान्यवर मंडळींनी पोदार गणेशोत्सव मंडळाला शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवासाठी प्राध्यापक अमित शिंदे, स्वाती बांगर यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचं सहकार्य लाभलं.






Article published in Maharashtra Times on 30th August 2025
Ganpati Festival Celebration 2025 by , R. A. Podar Ganesh Utsav Mandal